# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:२० एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.२० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेशपूर्व (पेट) परीक्षेच्या तिसऱ्या दिवशी ७७४ विद्यार्थ्यांपैकी ५२२ विद्यार्थ्यांनी पेटची ऑनलाईन परीक्षा दिली.

दिनांक १८ ते २२ एप्रिल पर्यंत विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात या परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. एकुण ३ हजार ६८८ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले आहेत. यासर्व परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जात असून त्यासाठी २५० संगणकांची व्यवस्था करण्यात आली आहे. एका दिवसात ४ बॅचेसमध्ये या परीक्षा होत आहेत. दिवसभरात चार बॅचेससाठी ७७४ विद्यार्थ्यांची नोंदणी होती. त्यापैकी ५२२ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. तिसऱ्या दिवशी विधी, शारिरीक शिक्षणशास्त्र, शिक्षणशास्त्र, औषधीनिर्माणशास्त्र, हिंदी, पाली, संस्कृत, उर्दू, सामाजिकशास्त्र या विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून करण्यात आलेल्या परीक्षेच्या व्यवस्थेबद्दल समाधान असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या. केंद्रप्रमुख म्हणून प्रा. पी.पी.माहुलीकर हे काम पहात असून मुख्य समन्वयक प्रा.समीर नारखेडे तर समन्वयक डॉ.मनोज पाटील आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून सहायक कुलसचिव व्ही.व्ही. तळेले आणि तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन काम पहात आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी